स्थापना
१ मे १९५७

E:\सन २०२६- २०२७\माहे जू... २०२६.doc 20

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा. क्र. विकसन/वीजतंत्री/गु.भु.वि.स्ट्री.खां.ब./वि.का./ ६६६७/२०२६- २७ दि.१७/ ०६ / २०२६

**प्रसिद्धीपत्रक**

**विषय :-** तात्काळ गुळ भुसार बाजार आवारातील फाऊंडेशनमधून वाकलेला पाच स्ट्रीट लाईटचे खांब काढून त्याजागी नविन फाऊंडेशन करून खांब उभारणेकामी आवश्यक ती विद्युत कामे करणेकामाची दरपत्रके सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून विद्युत ठेकेदार यांना या प्रसिद्धीपत्रान्वये कळविण्यात येते की, कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणेच्या मुख्य बाजार आवारामधील गुळ भुसार बाजार आवारातील भु. क्र. ५३६, ५३८, ५५६, ४८८ व निसर्ग मंगल कार्यालयाकडे जाणा-या रस्त्यावरील वाकलेले पाच खांब तात्काळ फाऊंडेशनमधून काढून त्याजागी नविन फाऊंडेशन करून खांब उभारणेकामी आवश्यक ती विद्युत कामे करणेसाठी दरपत्रके मागवित आहोत.

सदरचे काम करणेकामी खाली नियम व अटींचे अधीन राहून विद्युत ठेकेदारांनी आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सीलबंद पाकिटामध्ये संस्थेच्या वीजतंत्री कार्यालयामध्ये सादर करावे.

**नियम व अटी :-**

१. सदर कामाचे दरपत्रक मागणीकामी विद्युत ठेकेदाराने वीजतंत्री विभागाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच सदर कामाचे दरपत्रकाची रक्कम रु.२३६/- (जीएसटीसह) बाजार समितीचे मुख्य कार्यालयामध्ये भरणा केल्यानंतर त्याची पावती वीजतंत्री विभागामध्ये सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर विद्युत ठेकेदारास दरपत्रक देणेत येईल.

२. सदर कामाचे दरपत्रक दि.२३/ ०६ / २०२६ ते दि.२५/ ०६ / २०२६ या कालावधीमध्ये संस्थेच्या वीजतंत्री कार्यालयात कार्यालयीन कामकाजाचे वेळेत मिळेल.

३. विद्युत ठेकेदारांनी त्यांचे दरपत्रक व तांत्रिक कागदपत्रे सीलबंद पाकिटामध्ये दि.२७/ ०६ / २०२६ रोजी दु. ४.०० वाजेपावेतो संस्थेच्या वीजतंत्री कार्यालयामध्ये सादर करावी.

४. सदर कामाचे दरपत्रकासोबत विद्युत ठेकेदाराचे लायसन्स व अशा प्रकारे काम केलेबाबतचा अनुभवाचा दाखला सादर करावा.

५. मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्वीकेरली जाणार नाही.

६. दरपत्रके उघडते वेळी सबंधित ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीच्या मुख्य कार्यालयामध्ये हजर रहावे.

७. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.

८. नियम व अटी मान्य असणा-या ठेकेदारांनीच आपली दरपत्रके सादर करावीत.

९. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.२९/ ०६ / २०२६ रोजी दु. ४.०० वाजता संस्थेच्या मुख्य कार्यालयातील उपसचिव यांचे दालनामध्ये दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील. दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास ठेकेदारांना दूरध्वनीद्वारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.

**मा. सभापती साहेब यांचे मान्यतेने**

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती, पुणे.

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७